# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

कृषि नगर, वसमत रोड,

परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| | | | |
|---|---|---|---|
| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
| वेबसाईट | : www.vnmkv.gov.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५,२२३५८२ |


**संदर्भ:** १. महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम,१९९० मधील परिनियम क्र. ८८ (२) व (३)

२. सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्रमांक आरटीआर २०१४/प्र. क्र. ३५५/१२ दिनांक ६ जून २०१७

३. मा. कुलगुरू महोदय, वनामकृवि, परभणी यांनी मंजूरी दिलेली टिपणी क्र.५१०० दि.०९-०१-२०२३ आणि टिपणी क्र.५३४८ दि.२७-०१-२०२३

४. वनामकृवि, परभणी विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्र. ०९ व १०/२०९/१६.०२.२०२३

**कनिष्ठ लिपीक व वरीष्ठ लिपीक संवर्गातील पदभरतीच्या प्रमाणात बदल करणेबाबत...**

**क्रमांक२०२३/सं.क्र.५१३/आस्था-३** 1293 **दिनांक २०/०३/२०२३**

## विद्यापीठ परिपत्रक

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील कनिष्ठ लिपीक व वरीष्ठ लिपीक या दोन संवर्गातील नामनिर्देशनाने व पदोन्नतीने करावयाच्या पदभरतीचे प्रमाण खालीलप्रमाणे होते.

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | पदभरतीचे प्रमाण (टक्के) | |
|---|---|---|---|
| | | नामनिर्देशन | पदोन्नती |
| १ | कनिष्ठ लिपीक/तत्सम | ७५ | २५ |
| २ | वरीष्ठ लिपीक/तत्सम | ५० | ५० |

संदर्भ क्र. २ वरील शासन अधिसुचनेनुसार कनिष्ठ लिपीक संवर्गातील पदभरती प्रमाणात बदल करण्याबाबत शासन निर्देश प्राप्त झाले आहेत. तसेच कनिष्ठ लिपीक संवर्गातील पदोन्नतीने पदभरतीचे प्रमाण २५ टक्केवरून ५० टक्के इतके करण्याबाबतचे निवेदन वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांकडून दि.२५-०६-२०२० रोजी प्राप्त झाले आहे. तसेच वरीष्ठ लिपीक संवर्गातील पदोन्नतीने करावयाच्या पदभरतीचे प्रमाण ५० टक्केवरून ७५ टक्के इतके करण्याबाबत कनिष्ठ लिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांकडून दि.१९-१२-२०२२ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.

त्यानुषंगाने महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम, १९९० मधील परिनियम ८८ (२) व (३) नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, मा. कुलगुरू महोदय, वनामकृवि, परभणी यांनी कनिष्ठ लिपीक व वरीष्ठ लिपीक या दोन संवर्गातील नामनिर्देशन व पदोन्नतीने करावयाच्या पदभरती प्रमाणात खालीलप्रमाणे बदल करण्यास संदर्भ क्र.०३ नुसार मंजूरी दिली आहे.

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | पदभरतीचे प्रमाण (टक्के) | |
|---|---|---|---|
| | | नामनिर्देशन | पदोन्नती |
| १ | कनिष्ठ लिपीक/तत्सम | ६० | ४० |
| २ | वरीष्ठ लिपीक/तत्सम | २५ | ७५ |

कनिष्ठ लिपीक व वरीष्ठ लिपीक या दोन संवर्गाच्या पदभरती प्रमाणात उपरोक्तप्रमाणे केलेल्या बदलासंदर्भातील विषयाचा ठराव विद्यापीठ कार्यकारी परिषदेने संदर्भ क्र. ०४ अन्वये मंजूर केला आहे.

नामनिर्देशनाने व पदोन्नतीने पदभरतीच्या प्रमाणात उपरोक्तप्रमाणे करण्यात आलेले बदल हे दि.०१-०१-२०२३ रोजीपासून अंमलात येतील. त्यानुषंगाने या संवर्गाच्या बिंदुनामावली नोंदवह्या अद्ययावत करणे, सहाय्यक आयुक्त (मावक), औरंगाबाद यांच्याकडून त्यांची तपासणी करून घेणे तसेच पदभरती करणे इत्यादी बाबतची कार्यवाही प्रचलित शासन नियम/निर्णयानुसार करण्यात यावी.

**मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने,**

डॉ. धिरजकुमार रा. कदम

कुलसचिव